महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ❖१७ जून २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक ३४९ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




## वसई विरारमधील वीस वर्षांचा बॅकलॉग भरून काढणार

### – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/

**वसई** : वसई विरारची अवस्था बकाल झालेली आहे. शहराचा अपेक्षित विकास झाला नाही, त्यामुळे मागील २० वर्षांचा राहिलेला बॅकलॉग पुढील ५ वर्षात भरून काढणार, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वसईच्या आमदार स्नेहा दुबे-पंडित यांच्या कार्यालयाच्या उद्घघाटनासाठी फडणवीस सोमवारी दुपारी वसईत आले होते. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना महापालिका निवडणुकीच्या कामाला लागण्याचे आवाहन केले. विधानसभेप्रमाणे महापालिकेतही सत्तापरिवर्तन घडवून दाखवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी वसई विरार मध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. या निवडणुकीत तिन्ही जागा महायुतीने जिंकल्या. या नंतर पहिल्यांदाच सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वसईत आले होते. आमदार स्नेहा दुबे-पंडित वसई रोड माणिकपूर येथील जनसंपर्क कार्यालयाचे उद्घघाटन त्यांच्या हस्ते झाले. आपल्या छोटेखानी भाषणात त्यांनी जनतेने निवडून दिल्याबद्दल आभार मानले. वसईत कमळ फुलत नव्हते याची आम्हाला गेल्या अनेक वर्षांपासून खंत होती. पण वसईकरांनी स्नेहा दुबे-पंडित, राजन नाईक यांना निवडून आणून क्रांती घडवली असे ते म्हणाले.

वसई विरार मधील आधीच्या लोकप्रतिनिधींवर त्यांनी टिका केली. वसई विरार हे महापालिका क्षेत्र आहे. मात्र येथील परिस्थिती पाहता आपण नक्की शहरात आहोत की खेड्यात असा प्रश्न पडतो, असे ते म्हणाले. वेळीच नियोजन झाले असते, सोयी सुविधा मिळाल्या असत्या तर मुंबई व इतर महापालिकांप्रमाणे वसई विरार महापालिकेचाही विकास झाला असता असे ते म्हणाले. वसईचा विकास न झाल्याने आगामी ५ वर्षात मागील २० वर्षाचा बॅकलॉग भरून काढणार असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात जाहिर केले.

**कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आवाहन**

महापालिका निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आवाहन केले. विधानसभेप्रमाणे महापालिकेत परिवर्तन घडवा, परिवर्तनाची किल्ली महापालिकेत आहे, असे ते म्हणाले. भर पावसात मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. यानिमित्ताने भाजपने जोरदार शक्तीप्रदर्शन केले. यावेळी पालकमंत्री गणेश नाईक, भाजपा कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार हेमंत सावरा, आदिवासी विकास समितीचे अध्यक्ष विवेक पंडित, आमदार निरंजन डावखरे, आमदार राजन नाईक, भाजपाच्या नेत्या राणी द्विवेदी भाजप वसई विरार जिल्हाध्यक्ष प्रज्ञा पाटील आदी उपस्थित होते.

## ठाणे जिल्ह्यात पावसाची दमदार हजेरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : ठाणे जिल्ह्यातील शहरी भागासह ग्रामीण भागात पावसाने दमदार हजेरी लावली आहे. त्यामुळे गेल्या तीन ते चार दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या ठाणेकरांना दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यात मागील २४ तासात ३५.६ मिमी इतक्या पावसाची नोंद करण्यात आली आहे. तर, ठाणे तालुक्यात सर्वाधिक ५५ मिमी इतक्या पावसाची नोंद करण्यात आली.

तर, सोमवारी सकाळ पासून कोसळणाऱ्या पावसामुळे ठाणे शहरातील सखल भागात पाणी साचण्याच्या घटना घडल्या आहेत. तर, सोमवारी शाळेचा पहिला दिवस असल्याने पालकांची विद्यार्थ्यांना शाळेत नेताना तारांबळ उडाल्याचे दिसून आले. तसेच उल्हास नदीचा प्रवाह वाढल्याने लगतच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला. तर, उल्हासनगरात पूल कोसळल्याने ५०० गावांचा संपर्क तुटला आहे. बाळेगाव येथे दोन घरांचे नुकसान झाल्याची घटना घडली. ठाणे जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्याने उकाड्यात वाढ झाली होती. अशातच शनिवार पासून पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात झाली. त्यात रविवार पासून जिल्ह्यातील विविध भागात पावसाचा जोर वाढल्याचे दिसून आले. त्यामुळे वातवरणात कमालीचा गारवा निर्माण झाला होता. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांची सुटका झाली.

या मुसळधार पावसामुळे रेल्वे सेवेवर देखील त्याचा परिणाम झाला. तर, सखल भागात पाणी साचल्यामुळे रस्ते वाहतुकीवर देखील त्याचा परिणाम झाला होता. तर, दुसरीकडे डोंबिवली शहरातील अनेक सखल भागात, रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण झालेल्या भागात पाणी तुंबण्याच्या घटना घडल्या आहेत. तर, उल्हास नदीचा प्रवाह हा कर्जत तालुक्यातून शहरात येत असल्याने, उल्हास नदी पात्रात पाण्याची पातळी वाढली असून, नदीवरील चौपाटीच्या पायऱ्या देखील पाण्याखाली गेल्या आहेत.

## २७ गावांची स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्याची मागणी

### अन्यथा मंत्रालयावर तीन लाख आगरी बांधवांचा मोर्चा काढावा लागेल – संघर्ष समितीचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : 27 गावांचे स्वतंत्र नगरपालिका / (महा) (स्थापन करण्यासाठी संघर्ष समितीने आक्रमक पवित्रा घेतलं 27 गाव संघर्ष समितीत फूट पडल्यानंतर सर्व पक्ष हक्क संरक्षण संघर्ष समिती स्थापन करण्यात आली या समितीचे अध्यक्ष पद शरद पवार गटाचे खासदार सुरेश उर्फ बाळुमामा मात्रे यांना देण्यात आले. संघर्ष समितीची जाहीर सभा डोंबिवलीतील होराएझन हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती या सभेसाठी संघर्ष समितीचे अध्यक्ष खासदार सुरेश उर्फ बाळ्या मामा म्हात्रे ,ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे , माजी आमदार राजू दादा पाटील ,राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पदाधिकारी ,काँग्रेसचे पदाधिकारी ,भाजप आणि शिंदे गटाचे सर्वपक्षीय पदाधिकारी उपस्थित होते . या सभेत ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी या सभेला येण्यासाठी मी राजकीय जोडे बाहेर ठेवून आलोय . संघर्ष समितीचा इतिहास पाहता कल्याण डोंबिवली महापालिकेने या गावांना त्रास दिला त्यामुळे या महापालिकेतच आता राहायचं नाही. नुसतेच मीटिंग घेऊन काय होणार नाही त्यासाठी रस्त्यावर



उतरावे लागेल. लाखोंचा मोर्चा घेऊन मंत्रालयावर जावं लागेल. नवी मुंबई विमानतळाच्या नामांतरणासाठी जे आंदोलन केलं तसेच आंदोलन पुन्हा एकदा उभं करावं लागेल असे सांगितले .पालिकेच्या निवडणुकी लागल्या तर 27 गावे बाहेर पडू शकत नाही यासाठी तयारी करा आणि सत्ताधारी लोकांबरोबर संघर्ष करन्यासाठी रस्त्यावर उतरा असे आवाहन केले .मनसे चे माजी आमदार राजु पाटील यांनी मला 2019 ला विधानसभा निवडणुकीत संघर्ष समितीने पाठिंबा दिला. मी आमदार असताना 27 गावांची

**खासदार म्हात्रे यांनी सांगितला २०१९ चा किस्सा**

**माझ्या डिक्शनरीत अशक्य हा शब्द नाही. २००९ मध्ये मी विधानसभेला पडलो २०१४ ला लोकसभा निवडणुकीत पडलो हे सांगतानाच खासदार मात्रे यांनी २०१९ ला कपिल पाटील यांचे तिकीट कट करून तुम्हाला तिकीट देतो अशी शिवसेनेकडून कमिटमेंट करण्यात आल्याचा त्यांनी गौप्यस्फोट खासदार सुरेश म्हात्रे यांनी केला**

स्वतंत्र नगरपालिका तयार करण्यासाठी पाठपुरावा केला .सर्वांचे हरकत असतानाच एका आयुक्ताने एका ओळीचा ठराव केला .. आणि 27 गाव वेगळी केली ..याचा धनी कोण असा सवाल केला . 27 गावातील निवडणुकीवर बहिष्कार टाकणार असेल तर मनसे या ठिकाणी एकही उमेदवार देणार नाही आमचा पाठिंबा असेल . आता उग्र आंदोलन करावाच लागेल .या लोकांना गाव बंदी केल्याशिवाय काहीच होणार नाही...

याच्या PA चे 4 फ्लॅट आहे वेळ आल्यावर मी बाहेर काढेल ...आत्ताचे आमदार काही करत नाही कारण त्याच्या हातात काही नाही ... नाव न घेता शिंदे गट आणि आमदार राजेश मोरे वर टीका केली . समाज म्हणून आपण एकत्र आलो नाही तर हे भैया लोक आमदार होतील .... मात्र खासदार आपण होऊ देणार नाही तो आपणच ठरवू असा टोला लगावला.

अनधिकृत बांधकाम मी मानत नाही आम्ही भूमिपुत्रत आमचे जागेवर आम्ही बांधकाम करणार पलावा पुला चे नाव तिथल्या तीन गावचे नावे मिळून दया अशी मागणी केली .तर संघर्ष समितीचे अध्यक्ष सुरेश उर्फ बाळ्या मामा म्हात्रे यांनी सांगितले की ,'कोणत्याही परिस्थितीत केडीएमसी तुन बाहेर पडायचे ,तुम्ही 43 वर्ष हा लढा लढताय ,या मागणीसाठी 43 वर्ष सातत्याने लढतोय त्याबद्दल लढ्यात सहभागी असलेल्याचे अभिनंदन ,माझ्यावर जबाबदारी आल्यानंतर मी संस्था नोंदणी केली ..कोणत्याही पक्षाचा नेता असू देत जे आपलं काम करतील त्यांचे धन्यवाद मानायचे .मुख्यमंत्री सागर बंगल्यावर बैठक लावली होती ..चर्चा करताना काही राजकीय असल्याचे जाणवले नाही ...मुख्यमंत्र्यांनी सांगितले एक सामाजिक कार्यक्रम लावा ..ज्या ठिकाणी मी स्वतः येईल ..तुम्ही मागणी करा मी होकार देईन ..आजची सभा झाल्यानंतर पुन्हा एकदा वेळ घेईन ...जिथे भक्ती आणि शक्ती एक होते तिथे इतिहास घडतो प्रत्येक ठिकाणी समाजाच्या वेगवेगळ्या समस्या आहेत ..एक मोर्चा मंत्रालयावर कमीत कमी तीन ते चार लाख लोकांचा गेला पाहिजे त्या दिवशी तुम्हाला तुमच्या समस्या विचारतील ..27 गावांचा विषय 1 वर्षात सुटलाच पाहिजे,माझ्या डिक्शनरीत अशक्य हा शब्द नाही ,व्यासपीठावर सगळयाना एकत्र बघितलं तेव्हा अशक्य हा शब्दच नाही.27 गावांची स्वतंत्र नगरपालिका होणारच.सुप्रीम कोर्टाने निर्णय देईपर्यंत निवडणुका स्थगित करण्यात याव्यात अशी मागणी करणार असल्याचे सांगितले

**थोडक्यात महत्वाचे**

## गोवेली येथे आ किसन कथोरे यांच्या हस्ते साहित्याचे वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे : जिल्हा परिषद ठाणे जिल्हा समाज कल्याण विभाग आणि पंचायत समिती कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने 20% जिल्हा परिषद सेस फंडामार्फत मागासवर्गीय वस्ती आणि मागासवर्गीय लाभार्थी यांना आज दिनांक 16 जून 2025 रोजी जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे मुरबाड मतदार संघाचे आमदार माननीय श्री किसनजी कथोरे यांच्या हस्ते साहित्याचे वाटप करण्यात आलं. यावेळेस आमदार किसन कथोरे यांनी शासनाकडून येणाऱ्या प्रत्येक योजनेचा अगदी तळागाळातील लोकांना लाभ घेता यावा यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून आले. त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनात देखील उपस्थितांना इतर योजनेची माहिती देत जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचण्यासाठी त्यांचे कार्यकर्ते तसेच गावागावातील सरपंचांना सूचना केल्या. जेणेकरून प्रत्येक सामान्य माणसापर्यंत शासनाच्या योजना पोहोचतील. त्यानंतर लाभार्थ्यांना विविध साहित्याच वाटप करण्यात आल आणि त्यामुळे अनेकांच्या चेहऱ्यावर शासनाप्रती आधार युक्त समाधान व्यक्त होताना दिसून आले. तसेच कृषी विभाग अंतर्गत भाजीपाला मिनी किट देखील वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. नरेश टेंभे यांनी केले.यावेळेस उपस्थित असलेले कल्याण चे गटविकास अधिकारी संजय भोये त्यांनी देखील पंचायत समितीच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली.या कार्यक्रमास जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे गटविकास अधिकारी रघुनाथ गवारी कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे भाजपा कल्याण ग्रामीण अध्यक्ष शेखर लोणी टीडीसी बँकेचे उपाध्यक्ष अरुण पाटील भाजपा युवा नेते चिंतामण मगर शिवसेना युवा नेते संतोष सुरोशी,विस्तार अधिकारी पराग भोसले प्रशांत गजाकोष तसेच परिसरातील विविध गावांचे सरपंच व उपसरपंच ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

## जीवनदीप विधी महाविद्यालयास नॅक 'बी++' ग्रेड प्राप्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



गोवेली : जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित विधी महाविद्यालय गोवेली ता कल्याण जि ठाणे येथे दिनांक ४ व ५ जून २०२५ रोजी महाविद्यालयाच्या नॅक मूल्यांकनाकरिता डॉ पी. ईश्वरा भट ( कुलगुरू पश्चिम बंगाल राष्ट्रीय विद्यापीठ) , डॉ.जयप्रसाद राय ( प्रोफेसर बनारस हिंदू विद्यापीठ) प्राचार्य डॉ.मोहिदरकुमार गुप्ता (फरीदाबाद) यांच्या त्रिसदस्यीय समितीने ऑनलाईन भेट देऊन मागील पाच वर्षांच्या कामकाजाचा आढावा सात घटकांच्या आधारे घेतला.त्याच बरोबर विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, संस्था प्रतिनिधी, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. यात महाविद्यालयाने पहिल्याच प्रयत्नात बी++ ग्रेड प्राप्त केला.यामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. या महाविद्यालयाची स्थापना २०१८ साली जीवनदीप शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून श्री रविंद्र घोडविंदे सर यांनी केली होती. गोवेली सारख्या बहुल व दुर्गम भागात ज्ञानदानाचे कार्य महाविद्यालययाच्या माध्यमातून केले जाते. महाविद्यालय हे विनाअनुदानित असून गुणवत्तेशी कुठल्याही प्रकारची तडजोड केली जात नाही. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.रविंद्र घोडविंदे, सौ.स्मिता घोडविंदे , श्री. प्रशांत घोडविंदे,,प्र.प्राचार्य जयकुमार रिजवानी यांनी महाविद्यालाचे अभिनंदन केले. या सगळयातच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या प्रक्रियेसाठी अतिशय परिश्रम घेतले.









# गीतासार



**अध्याय १३**
**क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः**

अनादित्वा न्निर्गुणत्वा त्परमात्माय मव्ययः । शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते ॥ १३-३१ ॥

हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), हा अविनाशी परमात्मा अनादी आणि निर्गुण असल्यामुळे शरीरात राहात असूनही वास्तविक तो काही करीत नाही आणि लिप्त होत नाही. ॥ १३-३१ ॥

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते । सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥ १३-३२ ॥

ज्याप्रमाणे सर्वत्र व्यापलेले आकाश सूक्ष्म असल्याकारणाने लिप्त होत नाही त्याचप्रमाणे देहात सर्वत्र व्यापून असलेला आत्मा निर्गुण असल्याकारणाने देहाच्या गुणांनी लिप्त होत नाही. ॥ १३-३२ ॥

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः । क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥ १३-३३ ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), ज्याप्रमाणे एकच सूर्य या संपूर्ण ब्रह्मांडाला प्रकाशित करतो, त्याचप्रमाणे एकच आत्मा संपूर्ण क्षेत्राला प्रकाशित करतो. ॥ १३-३३ ॥

क्षेत्रक्षेत्रज्ञ योरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा । भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् ॥ १३-३४ ॥

अशा प्रकारे क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांतील भेद तसेच कार्यासह प्रकृतीपासून मुक्त होण्याचा मार्ग ज्ञानदृष्टीने जे पुरुष तत्त्वतः जाणतात, ते महात्मे परब्रह्म परमात्म्याला प्राप्त होतात. ॥ १३-३४ ॥

# भिवंडी तालुक्यातील सोनाळे जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : ग्रामीण भागातील विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेत येण्यासाठी शिक्षक व शालेय संस्थासह सर्वांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.शाळेत मातृभाषेतील शिक्षण सृजनशीलतेला वाव देणारे आहेच पण विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळण्यासाठी सुध्दा प्रयत्न होणे गरजेचे आहे असे परखड मत ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी भिवंडीत झालेल्या कार्यक्रमात व्यक्त केले.



भिवंडी तालुक्यातील सोनाळे जिल्हा परिषद शाळेत " विद्यार्थ्यां प्रवेशोत्सव पाऊल खुणा उमटवत " हा मुख्य कार्यक्रम ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या उपस्थितीत सकाळी आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिप.चे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे भिवंडी उपविभागीय अधिकारी अमित सानप,तहसीलदार अभिजित खोले,जिल्हा शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे,गट विकास अधिकारी गोविंद खामकर,पंचायत समिती शिक्षणाधिकारी संजय अस्वले,सरपंच माया तरे यांच्यासह ग्रामस्थ व पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ठाणे जिल्ह्यातील सुमारे1300 शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वातावरण अधिक पोषक असावे तसेच शाळांचा अध्ययन स्तर उंचावण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन विशेष प्रयत्न करीत आहे असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी पुस्तके,दप्तर गणवेश बुट देऊन

### मात्रुभाषेबरोबर इंग्रजी प्रभुत्व मिळवण्यासाठी प्रयत्न करा
– जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

**शाळेच्या प्रांगणात 'एक पेड माँ की नाम' या संकल्पनेतून औंदुबर वृक्षाचे रोप मान्यवरांच्या हस्ते लावण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजयकुमार जाधव यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका पुष्पावती भोईर व सर्व शिक्षक ग्रामपंचायत प्रशासन यांनी मेहनत घेतली.मान्यवरांचे विद्यार्थ्यांनी लेझिम पथक, वाद्य वाजवून स्वागत केले.**

त्यांचे स्वागत करीत असताना शाळेचा पहिला दिवस हा आयुष्याची मुहूर्तमेढ रोवणारा दिवस पाऊलखुणांची नोंद करून साजरा केला जात आहे.चिमुकल्या पाऊलखुणा या भविष्यात देशाला मार्गदर्शक ठरोत अशा शुभेच्छा ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिल्या. शाळांच्या पट नोंदणी मध्ये 25 टक्के वाढ उद्दिष्ट ठेवले आहे.त्यासाठी गावातील विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेत येण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी केले. मागील एक वर्षात जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक स्तर उंचावला गेल्याने जिल्ह्यातील नवोदय शाळेतील 30 पैकी 23 जागा जिल्हा परिषद शाळां मधील विद्यार्थ्यांनी पटकावल्या आहेत. तर शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात प्रथम येण्याचा गौरव जिल्हापरिषद शाळेतील मुलाने पटकावला आहे.जिल्ह्यातील शाळा सक्षम केल्या जात आहे अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी यावेळी दिली.

# बळेगाव येथे पावसामुळे घरे कोसळली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील नावडीचीपाडा (रांजणगाव) बळेगाव येथे रविवारी संध्याकाळी ७ वाजता भरपावसात २ घरे कोसळली आहेत घराला घर लागुन होते राहुल पवार व अलका पवार यांचे राहाते घर होते सुदैवाने कोणाला काही लागलं नाही पण घरातले धान्य व सामान पाण्यात भिजवून गेले आहे सदरची घटना घडल्यावर आमचे प्रेरणास्थान .सुभाषदा पवार मित्र



मंडळाचे मार्गदर्शक प्रकाश पवार , संजय पवार,बंडू पवार यांना फोन करताच ते घटनास्थळी दाखल झाले व सर्व पाहाणी केली आणि तहसीलदार अभिजित देशमुख व तळाठी,सर्कल यांना फोन करून तात्काळ पंचेनामें करून तात्काळ मदत मिळावी अशी मागणी करण्यात आली आहे.यावेळी ग्रामस्थ मुकुंद आण्णा पवार,साईनाथ कदम, विष्णू पवार शरद पवार,भावेश खापरे उपस्थित होते.

# पोलीस उपनिरीक्षक प्रभाकर पाटील सेवानिवृत्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : भिवंडी तालुक्यातील घोटगाव या गावचे सुपुत्र व शेतकरी कुटुंबातील प्रभाकर गणपत पाटील हे 1988 साली पोलीस सेवेत रुजू झाले. व 37 वर्षे नऊ महिने बारा दिवस अशी प्रदीर्घ सेवा पोलीस दलात करून ते 31 मे 2025 रोजी सेवानिवृत्त झाले. नुकताच त्यांचा सेवापुर्ती सोहळा मोठ्या आनंदात व जल्लोषात साजरा करण्यात आला.




प्रभाकर पाटील हे अतिशय शांत व संयमी वृत्तीचे होते त्यांचा स्वभाव अतिशय मनमिळाऊ व नम्र होता पोलीस दलात रुजू झाल्यापासून अतिशय प्रामाणिकपणे त्यांनी आपली कर्तव्य पार पाडली. अनेक अन्यायग्रस्तांना त्यांनी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही आमिषाला बळी न पडता त्यांनी आपली सेवा प्रामाणिकपणे बजावली. त्यांनी आपली सेवा वाडा, कुडूस मुरबाड, नालासोपारा, वसई या भागामध्ये केली. या भागात सेवा करत असताना त्यांनी या भागातील गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर एक वेगळी जरब बसवली होती यासाठी त्यांना आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत होते त्यांनी कर्तव्यात कसूर न करता प्रामाणिकपणे सेवा करून व अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देऊन एक वेगळी छाप निर्माण केली होती त्यामुळे त्यांनी सेवा केलेल्या भागांमध्ये ते सर्वांना सुपरीचित होते एक प्रामाणिक व निस्वार्थी अधिकारी म्हणून आपली छाप निर्माण केली होती त्यांच्या या कार्याची दखल घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना वेळोवेळी प्रमोशन दिल्याने ते पोलीस शिपायापासून ते पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंत ते पोहोचले होते असे हे प्रामाणिक पोलीस उपनिरीक्षक प्रभाकर पाटील यांचा सेवापुर्ती सोहळा नुकताच घोटगाव येथे संपन्न झाला या कार्यक्रमासाठी परिसरातील अनेक मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या व यावेळी पोलीस उपनिरीक्षक प्रभाकर पाटील यांच्या कार्याचे उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून कौतुक केले व व त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. आता मी नियत वयोमानानुसार सेवेतून मुक्त जरी झालो असलो तरी समाजासाठी मी माझ्या परीने योगदान देईल व सामाजिक कार्य करीत राहीन तसेच माझा शेती हा परंपरागत व्यवसाय असून तो जपण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करून सामाजिक कार्यातील विविध स्तुत्य उपक्रम घेऊन एक आदर्श जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेन असे त्यांनी सत्कार सोहळ्याप्रसंगी आपल्या मनोगतातून व्यक्त केले व उपस्थितांचे आभार मानले.

### कल्याणमधील फोर्टिस हॉस्पिटल तर्फे
# 'फादर्स डे'ला मोफत युरोलॉजी तपासणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आंतरराष्ट्रीय फादर्स डे निमित्त आयोजित एका विशेष उपक्रमाचा भाग म्हणून फोर्टिस हॉस्पिटल कल्याणने ४० वर्षांवरील पुरुषांसाठी प्रोस्टेट तपासणी शिबिरांचे आयोजन केले. १४ आणि १५ जून रोजी कन्सल्टंट युरोलॉजिस्ट, युरो-ऑन्कोलॉजिस्ट आणि किडनी ट्रान्सप्लांट सर्जन डॉ. प्रदीप व्यवहारे यांच्या नेतृत्वाखाली दोन ठिकाणी दोन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये कल्याण, डोंबिवली आणि ठाकुर्ली येथील १५४ व्यक्तींनी सहभाग घेतला. या शिबिरात सहभागी



झालेल्या पुरूषांची प्रोस्टेट तपासणी करण्यात आली, सल्लामसलत करण्यात आली, प्रतिबंधात्मक केअरबद्दल मार्गदर्शन करण्यात आले आणि गरजेनुसार पुढील तपासणी करण्यात आली.

या शिबिरांमध्ये सर्व सहभागींशी वैयक्तिक सल्लामसलत करण्यात आली, ज्यामुळे त्यांच्या वैयक्तिक समस्या आणि वारंवार विचारले जाणाऱ्या प्रश्नांचे निराकरण करण्यास मदत झाली. डॉ. प्रदीप व्यवहारे यांनी सुरुवातीच्या लक्षणांवर आणि मूत्रविकाराच्या आजारांचे वेळेवर व्यवस्थापन यावर माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. ज्यामध्ये प्रोस्टेट आरोग्य, यूरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन्स (यूटीआय) (मूत्रमार्गाचे संक्रमण), किडनी स्टोन, मूत्रमार्गातील अडचणी, वाढलेली प्रोस्टेट इत्यादी प्रमुख विषयांवर चर्चा करण्यात आली. या सत्रात उपस्थितांना आरोग्यसेवा व्यावसायिकांशी संवाद साधण्याची, त्यांना प्रोस्टेट आरोग्याबद्दल प्रश्न विचारण्याची आणि उपलब्ध प्रतिबंधात्मक उपाय व उपचारांबद्दल जाणून घेण्याची संधी मिळाली.

तपासणी शिबिरातील सहभागींची प्रारंभिक तपासणी करण्यात आली आणि ज्यांना अधिक तपासणीची आवश्यकता होती त्यांना योग्य निदान चाचण्या करण्याचा सल्ला देण्यात आला. उपस्थित व्यक्तींनी या उपक्रमाचे कौतुक केले, ज्यामध्ये ज्येष्ठ नागरिक व श्रमजीवी व्यावसायिकांसह वेळेच्या कमतरतेमुळे व यूरिनरी आरोग्याबाबत जागरूकतेच्या अभावामुळे वैद्यकीय मदत घेण्यास उशीर झालेल्या व्यक्तींचा समावेश होता.

### मनसे शहर शाखेच्या वतीने
# प्राथमिक आरोग्य केंद्रास टेटनस टॉक्सोइड (टीटी) इंजेक्शनचे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त येथील मनसे शहर शाखेच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्रास टेटनस टॉक्सोइड (टीटी) इंजेक्शनचे वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवसानिमित्त सर्वत्र विविध उपक्रम हाती घेतले होते. या अनुषंगाने येथील शहर शाखेच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत प्राथमिक आरोग्य केंद्रास टेटनस टॉक्सोइड (टीटी)



इंजेक्शन 0.5 एमएलचे 1800 ऐंप्यूल देण्यात आले.

यावेळी मनसेचे ठाणे जिल्हा संघटक मदन (अण्णा) पाटील, मनविसे राज्य उपाध्यक्ष संतोष साळवी, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोपतराव, शहापूर तालुका अध्यक्ष विजय भेरे, महिला सेना तालुकाध्यक्षा सविता गोणे, मनविसे तालुकाध्यक्ष विक्रांत मांजे, महिला सेना जिल्हा सचिव सुजाता केदारे, जिल्हा उपाध्यक्षा सुनीता ताई, तालुका सचिव दिपाली चौधरी, वासिंद ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी वैभव पडवळ यांच्यासह तालुक्यातील व वासिंद शहरातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तर या कार्यक्रमाचे नियोजन वासिंद शहर अध्यक्ष अमोल बोराडे, शहर सचिव कल्पेश शेलार, उपाध्यक्ष कुणाल पांडव, विकास तांगडे आदी पदाधिकारी यांनी केले होते.

## आरोग्य
# गुणकारी जिरे

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते**
जिऱ्यामध्ये लोह, फायबर आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. दररोज सकाळी ते सेवन केल्याने शरीराचे बॅक्टेरिया आणि विषाणूजन्य संसर्गापासून संरक्षण होते. बदलत्या ऋतूमध्ये, जेव्हा सर्दी-खोकला किंवा विषाणूजन्य आजाराचा धोका वाढतो, तेव्हा हे घरगुती उपाय शरीराला आतून मजबूत करते.

**वजन कमी करते :** वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी भाजलेले जिरे खूप उपयुक्त आहे. ते चयापचय गतिमान करते. त्यामुळे चरबी जलद जाळली जाते. तसेच, पोट बराच वेळ भरलेले वाटते. ज्यामुळे तुम्हाला वारंवार भूक लागत नाही आणि जास्त खाणे टाळता येते. सकाळी रिकाम्या पोटी ते सेवन केल्याने पोटाची चरबी कमी होण्यास मदत होते.

**त्वचेचे आजार दूर होतात :** जिऱ्यामध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात जे त्वचेच्या समस्या दूर करण्यास मदत करतात. मुरुमे, मुरुमे, फ्रिकल्स किंवा त्वचेच्या ऍलर्जीसारख्या समस्यांमध्ये ते प्रभावी आहे. याचे नियमित सेवन केल्याने रक्त शुद्ध होते आणि त्वचा नैसर्गिकरित्या चमकू लागते. ते त्वचेला आतून डिटॉक्स करते.

**तणाव आणि निद्रानाश दूर होते :** जिऱ्यामध्ये असलेले मॅग्नेशियम आणि थायमॉल सारखे घटक मज्जासंस्था शांत करतात. ते तणाव कमी करण्यास आणि मनाला आराम देण्यास मदत करते.

**रक्तातील साखर नियंत्रित होते :** भाजलेले जिरे रक्तातील साखरेची पातळी संतुलित करण्यास मदत करते. त्यात अँटीऑक्सिडंट्स आणि फायटोकेमिकल्स असतात जे शरीरातील इन्सुलिनची कार्यक्षमता सुधारतात. सकाळी रिकाम्या पोटी भाजलेले जिरे पावडर घेणे टाइप-2 मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरू शकते. ते साखरेच्या वाढीवर नियंत्रण ठेवते आणि उर्जेची पातळी राखते.

### जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेत
# पेण तालुका दुसरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : नुकत्याच केवाळे पनवेल येथे कीकबॉक्सिंग असोशिएशन ह्यांच्या विद्यमाने जिल्हास्तरीय कीकबॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. ह्या स्पर्धेत पेण येथील मार्गदर्शक रायगड भुषण रविंद्र म्हात्रे ह्यांचे जोहे कळवा, जिते, हमरापुर, खारपाडा, खरोशी येथे विद्यार्थ्यांसाठी कीकबॉक्सिंगचे प्रशिक्षण प्रथमेश मोकल आणि अयुष रसाळ ह्यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले.या स्पर्धेत विद्यार्थांनी13 गोल्ड मेडल, 6 सिलव्हर मेडल, 3 ब्रांझ मेडल पटकावून द्वितीय क्रमांकाची चॉम्पियनशिप पटकावली. सर्व यशस्वी खेळाडूंना पनवेल किकबॉक्सिंगचे सचिव मंदार पनवेलकर यांच्या हस्ते मेडल देऊन सन्माननीत केले. तसेच या स्पर्धेचे नियोजन निलेश भोसले आणि योगेश बैकर ह्यानी केले. यशस्वी विद्यार्थाची पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यामुळे खेळाडुंचे सर्व स्तरातुन कौतुक करण्यात येत आहे.

# सिद्धगडावरील बेपत्ता पर्यटकाचे शोधकार्य सुरू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील सिद्धगडावर मुंबई येथील... ट्रेक ग्रुप मधील एक व्यक्ती हरवली आहे.

हरवलेल्या तरुणाचे नाव साईराज धनंजय चव्हाण, वय -२२वर्षे, रा. नवी मुंबई, अशी माहिती खात्रीदार सूत्रांनी दिली आहे.


१८ पर्यटक फिरण्यासाठी रविवारी आले होते.त्यातील साईनाथ चव्हाण वय २२ नवीमुंबई येथे राहणारा तरूण पर्यटक गडावर हरवल्याची धक्कादायक माहिती समोर आली असुन याकामी मुरबाड पोलिस तसेच स्थानिक ग्रामस्थ युद्ध पातळीवर शोध घेत आहेत अशी माहिती खात्रीदार सुत्रांनी दिली आहे.

# टिटवाळ्यात रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा** : जागतिक रक्तदाता दिनाचे औचित्य साधून रविवारी प्रथमेश मंगल कार्यालय, टिटवाळा (पूर्व ) येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात 42 रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिरात माजी उपमहापौर उपेक्षा भोईर, शक्तिवान भोईर, अण्णा तरे, परेश गुजरे, मिलिंद सावंत, ब्रिजेश पांडे, विलास भारती, कल्याण तालुका ग्रामीण पोलीस स्टेशनचे सहा पोलीस इन्स्पेक्टर रणजित दोरकर, पीएसआय मल्लिकार्जुन कारामुंगे, मदन शेलवले व इतर मान्यवर उपस्थित होते. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी रेड स्वस्तिक सोसायटी, रिजेन्सी सर्वम फाऊंडेशन, स्पर्श फाऊंडेशन, रोटरी क्लब ऑफ टिटवाळा, इंडियन मेडिकल असोसिएशन, क्लीनिटेक लॅबोरेटरीस लिमिटेड व सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे यांचे सहकार्य लाभले.






## आजचे राशिभविष्य



**मेष**
तुमचे आरोग्य चांगले राहील. आज तुम्ही तुमच्या प्रियजनांसोबत चांगला वेळ घालवाल. घरगुती कामात रुची राहील.

**वृषभ**
पद्धतशीर दैनंदिन दिनचर्या आणि खाण्याच्या सवयी तुमचे आरोग्य चांगले ठेवतील. आणि तुम्हाला निरोगी आणि उत्साही वाटेल.

**मिथुन**
प्रत्येक काम स्वबळावर करण्याची क्षमता तुमच्यात असेल. पालकांशी तुमचे संबंध सुधारतील. तुमचा जोडीदार तुमच्या बोलण्याने प्रभावित होईल .

**कर्क**
स्वभावात गोंधळ आणि राग दिसू शकतो ज्यामुळे कुटुंबातील सदस्यही त्रासलेले राहतील. तुमच्या प्रियकरासाठी आजचा दिवस चांगला जाईल. आज

**सिंह**
मीडिया आणि संवादाशी संबंधित व्यवसायात यश मिळण्याची शक्यता आहे. या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेईल.

**कन्या**
व्यापारी पक्षांशी सौहार्दपूर्ण संबंध विकसित करण्याचा प्रयत्न कराल. आज कौटुंबिक बाबींमध्ये जास्त हस्तक्षेप करू नका.

**तूळ**
जवळच्या नातेवाईकांच्या आगमनामुळे घरात उत्सवाचे वातावरण राहील. अनेक प्रकारच्या विचारांची देवाणघेवाण होईल.

**वृश्चिक**
आज बऱ्याच दिवसांनी जवळचे नातेवाईक घरी येतील आणि परस्पर विचारांची देवाणघेवाण केल्याने घरातील वातावरण आनंदी राहील.

**धनु**
घराशी संबंधित काही समस्या दूर होणार आहेत. वरिष्ठ सदस्याच्या सल्ल्याकडे आणि मार्गदर्शनाकडे लक्ष देणे योग्य ठरेल.

**मकर**
तणावात न पडता वैयक्तिक कामावर लक्ष केंद्रित करू शकाल. मुलांचे शिक्षण आणि करिअरशी संबंधित काही कामही होऊ शकते.

**कुंभ**
सध्या वाढत्या खर्चात कपात करणे शक्य नाही. संयम आणि शांत राहा आणि रागाच्या ऐवजी शांततेने उपाय शोधा.

**मीन**
निरुपयोगी गोष्टींकडे लक्ष देऊ नका आणि तुमच्या कामात व्यस्त राहा. आज दुपारी परिस्थिती सकारात्मक राहील.

# राज्य रस्ते परिवहन महामंडळ राबविणार 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' मोहिम

## - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /मुंबई : शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनीसाठी "एसटी पास थेट तुमच्या शाळेत" ही मोहिम राबविण्यात येणार असून आता एसटीचे पास थेट त्यांच्या शाळा- महाविद्यालयात वितरित करण्यात येणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्ये रस्ते परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. मंत्री सरनाईक म्हणाले की, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा १६ जुन पासून सुरू होत आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६.६६ टक्के इतकी सवलत दिली आहे, म्हणजे केवळ ३३.३३ टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. त्याचप्रमाणे शासनाच्या "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर" योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते. यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनकडून पास घेतले जात असत. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना पाससाठी रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. त्यांच्या शाळा - महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. यामुळे त्यांचा शैक्षणिक वेळ वाया जाणार नाही.

एसटी महामंडळाच्या माध्यमातून "एसटी पास थेट तुमच्या शाळेत" ही विशेष मोहीम १६ जुन पासुन राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन पासची आवश्यकता असणाऱ्या शाळेतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे.

या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना होणार असल्याचेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले आहे.

# महापालिका शाळांतील शाळा प्रवेशोत्सवदिनी विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत !





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : महापालिकातील शाळातील शिक्षकांना, पालकांना, विद्यार्थ्यांना अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे, शाळेतील शिक्षणाचा दर्जा उंचवावा, शाळेची पटसंख्या वाढावी, यासाठी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागाने अनेक नविनतम उपक्रम हाती घेतले आहेत. याचाच एक भाग म्हणून महापालिकेच्या सर्व शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तेथील विद्यार्थ्यांच्या आहार-विहार, क्रीडा याबाबतच्या सुविधांची पाहणी करुन, त्या उत्तम दर्जाच्या देण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्येक शाळेसाठी एक पालकअधिकारी नेमण्यात आला आहे.

आज शाळा प्रवेशादिवशी मा.आमदार राजेश मोरे यांनी डोंबिवलीतील शाळा क्र.62 येथे आणि मा.आमदार सुलभाताई गायकवाड यांनी कल्याण मधील शाळा क्र.18 तिसगांव येथे तसेच अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी व इतर पालक अधिकाऱ्यांनी आणि माजी पदाधिकारी, पालिका सदस्य यांनी देखील समक्ष शाळांमध्ये उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे औक्षण करुन, पुष्पसुमनांनी स्वागत केले आणि उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शाळेच्या पहिल्या दिवशीच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या व पुस्तके वितरित करण्यात आली आणि पुढील 15 दिवसांत या विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे 2 नग, मौजे, शुज, रेनकोट, दफ्तर, पीटी ड्रेस इ. पुरविले जाणार आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी या शाळांमध्ये बसण्यासाठी नविन बेन्चेस इ. फर्निचरही पुरविण्यास सुरुवात केली आहे.

मुलांची शैक्षणिक क्षमता तपासण्यासाठी त्यांच्या गतवर्षाच्या अभ्यासक्रमाची परिक्षा येत्या 28 जूनला घेतली जाईल. त्यानंतर मुलांचे स्तर निश्चित करुन, त्यांना पुढील शिक्षण देण्यात येणार आहे. या संदर्भात पुढील आठवड्यात शालेय शिक्षकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले असून, माहे जुलै मध्ये शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे. मुलांचा शैक्षणिक स्तर वाढवू न शकणारे शिक्षक कारवाईस पात्र राहतील. महापालिकेच्या शाळा या "आनंदाची शाळा" व्हाव्यात, या दृष्टीकोनातून महापालिकेचा प्रयत्न राहिल, अशी माहिती शिक्षण विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांनी दिली.

आकर्षक माहितीपर रंगविलेल्या शाळेच्या भिंती पाहून, विद्यार्थी वर्ग हरखून गेल्याचे दिसून आले. यावर्षी प्रथमतः पालक अधिकाऱ्यांनी शाळेस पहिल्या दिवशी आस्थेने व आपुलकीने दिलेल्या भेटीमुळे शिक्षकवर्गाने समाधान व्यक्त केले.

सर्व बालवाड्या आकर्षक रंगाने सजविल्या असून, बालकांना अभ्यासक्रमावर आधारीत शैक्षणिक साहित्याचा कीट पुरविण्यांत आले आहेत. बालकांचे चेहऱ्यावरील आनंद अवर्णनीय असल्याचे प्रतिपादन बालवाडी शिक्षिकांनी केले.

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

मालमत्ता कर विभाग

**जाहीर आवाहन**

**"मालमत्ता कराच्या सूटमध्ये मुदतवाढ"**

जे करदाते दि.०१.०४.२०२५ ते दि. १५.०६.२०२५ या कालावधीमध्ये पहिल्या सहामाहीच्या कराच्या रकमेसह दुसऱ्या सहामाहीच्या रकमेचा कर असा एकत्रितरित्या महापालिकेकडे जमा करतील, अशा करदात्यांच्या दुसऱ्या सहामाहीच्या रकमेतील सामान्य करामध्ये १०% सूट देण्यात आली आहे. सदर सवलतीकरिता करदात्यांचा उस्फुर्त प्रतिसाद पाहता, तसेच करदात्यांकडून प्रशासनास होणारी विनंती, या अनुषंगाने सदरची सामान्य करातील १०% सवलत ही दि.३०.०६.२०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे. यामुळे जे करदाते दि. १६.०६.२०२५ ते दि. ३०.०६.२०२५ या कालावधीमध्ये पहिल्या सहामाहीच्या करासोबत दुसऱ्या सहामाहीची कराची रक्कम महापालिकेकडे जमा करतील अशा करदात्यांना खालीलप्रमाणे त्यांच्या दुसऱ्या सहामाहीच्या सामान्य कराच्या रक्कमेत १०% सूट देण्यात येत आहे.

| अ क्र | कालावधी | दुसऱ्या सहामाही सामान्य कराच्या रकमेवरील सूट |
|---|---|---|
| १ | दि. १५ जून पर्यंत भरल्यास | १०% |
| **२** | **दि. १५ जून ते ३० जून पर्यंत भरल्यास** | **४% ऐवजी १०%** |
| ३ | दि. ०१ जुलै ते ३१ जुलै | ३% |
| ४ | दि. ०१ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट | २% |

सदर सवलतीचा करदात्यांनी लाभ घ्यावा असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात येत आहे. मालमत्ता कर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असल्याने मालमत्ता कर महापालिकेकडे जमा करुन ठाणेकर करदात्यांनी महानगरपालिकेस सहकार्य करावे.

ठामपा/पिआरओ/कर/ ३५५/२०२५-२६
दि:१६.०६.२०२५

**सही/-**
उप आयुक्त (कर)
ठाणे महानगरपालिका, ठाणे

pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in

# कल्याणमध्ये स्लॅप कोसळल्याची घटना





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण पश्चिमेतील ग्राऊन्ड प्लस वन इमारतीच्या दुसर्या मजल्यावरील स्लॅप कोसळल्याची घटना संतोषी माता रोड नजीक राऊत चाळ परिसरात घडली. सुदैवाने यात कोणतीही जिवितहानी झाली नाही.

केडीएमसी सहाय्यक आयुक्त क प्रभाग यांनी दिलेल्या माहितीनुसार कल्याण पश्चिमेतील संतोषी माता रोड जवळ राऊत चाळ परिसरात सोमवारी सकाळी पावणेसातच्या सुमारास राजू बारी यांच्या मालकीच्या ग्राउंड प्लस वन इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील स्लॅप पहिल्या मजल्यावर कोसळला. या इमारतीत चार कुटुंबे राहत होती. दुसर्या मजल्यावरील कोसळलेल्या स्लॅप मध्ये कोणीही राहत नव्हते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जिवितहानी झाली नाही. घटनास्थळी क प्रभागक्षेत्र अधिकारी कर्मचारी तसेच अग्निशमन दलाच्या जवानांनी पोहचत कोसळलेल्या स्लपचा भाग काढून टाकला. या इमारतीत राहणाऱ्या चारही कुंटुबाने सुरक्षित ठिकाणी स्थालातंर केले असून इमारत मालकास इमारतीचे तातडीने स्टक्वर ऑडिट करून घेण्याबाबत नोटीस दिली असल्याचे सहाय्यक आयुक्त धनंजय थोरात यांनी सांगितले.

# स्टेम प्राधिकरणातर्फे
# अत्यावश्यक दुरुस्ती कामासाठी शटडाऊन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे: ठाणे महानगरपालिकेला स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा अत्यावश्यक दुरुस्ती कामामुळे बुधवार दि.१८.०६.२०२५ रोजी सकाळी ९.०० वा. ते गुरूवार दि.१९.०६.२०२५ रोजी सकाळी ९.०० वा पर्यंत बंद रहाणार आहे. त्या काळात ठाण्याच्या काही भागात १२ तास पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

या काळात, ठाणे महानगरपालिकेच्या स्वतःच्या पाणी पुरवठा योजनेचे नियोजन करुन टप्प्याटप्प्याने ठाणे शहरात एक वेळ पाणी पुरवठा सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार, घोडबंदर रोड, पातलीपाडा, पवार नगर, कोठारी कम्पाउंड, आझाद नगर, डोंगरीपाडा, वाघबीळ, आनंद नगर, कासारवडवली, ओवळा इत्यादी ठिकाणाचा पाणी पुरवठा बुधवार दि.१८.०६.२०२५ रोजी स. ०९.०० ते रा. ०९.०० वाजेपर्यंत बंद राहील. तसेच, समता नगर, ऋतु पार्क, सिध्देश्वर, ईटरनिटी, जॉन्सन, जेल, साकेत, उथळसर, रेतीबंदर, कळव्याच्या व मुंब्राचा काही भाग बुधवार दि.१८.०६.२०२५ रात्री ९.०० ते गुरूवार दि. १९.०६.२०२५ रोजी सकाळी ०९.०० वा. पर्यंत पाणी पुरवठा बंद राहील. अशा रीतीने टप्याटप्याने एक वेळ पाणी पुरवठा सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

दरम्यान, पाणीपुरवठा पूर्व पदावर येईपर्यंत पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होण्याची शक्यता आहे. तरी नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करुन ठेवावा. तसेच, पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन ठाणे महानगरपालिकेने केले आहे.

# अंबरनाथ पश्चिम भाजप युवा मोर्चा अध्यक्षपदी कुलदिप चोप्रा




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
अंबरनाथ : राज्यात भारतीय जनता पक्षाच्या कार्यकारणीत फेरबदल झाले आहेत या पार्श्वभूमीवर कल्याण परिमंडळा तही महत्त्वपूर्ण फेररचना झालीय. अंबरनाथ शहराच्या भारतीय जनता पक्ष अंबरनाथ (पश्चिम) युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी कुलदीप रामकिसन चोप्रा यांची वर्णी लागली आहे. पक्षाच्या वतीने भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांच्या नेतृत्वा खाली जेष्ठ नेते गुलाबराव करंजुले-पाटील यांच्या मार्गदर्शना खाली हि निवड करण्यात आली.

ठाणे जिल्हा अध्यक्ष नंदु परब आणि लक्ष्मण पंत (अध्यक्ष – अंबरनाथ पश्चिम मंडळ-१) यांच्या हस्ते त्यांना या अधिकृत नियुक्तीपत्र देण्यात आले. कुलदीप चोप्रा यांच्यावर राष्ट्रीय सेवक स्वयंसेवक संघाचे बाल स्वयंसेवक म्हणून संस्कार आहेत . त्यांची आई मीनाक्षी चोप्रा या भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेते असल्याने राजकारण व समाजकारणाचे बाळकडू चोप्रा यांना आई कडूनच मिळाले.

आजवर चोप्रा यांनी एक कार्यकर्त्याच्या भूमिकेतून पक्ष मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले . त्यांच्या अनुभवाचा फायदा युवा पिढीला व्हावा. तसेच, शहरातील युवकांचे शैक्षणिक प्रश्न सोडवणे, येथील खाजगी निमशासकीय नोकऱ्यांमध्ये अंबरनाथच्या तरुणांना प्राधान्य मिळावे, कला , क्रीडा क्षेत्रात युवकांना योग्य प्रोत्साहन मिळावे यासाठी आपण प्रयत्न करून एक व्यसनमुक्त व प्रगतशील युवा समाज निर्माण करण्याचा मानस चोप्रा यांनी व्यक्त केला. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर दाखवलेला विश्वास आपण सार्थ ठरविण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही चोप्रा यांनी स्पष्ट केली.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका शाळांमध्ये प्रवेशोत्सव

## आधुनिक शिक्षण पद्धतीद्वारे अमुलाग्र बदलाचे धोरण विद्यार्थ्यांचे स्वागत होणार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
भिवंडी : मिरा-भाईंदर महानगरपालिका आपल्या क्षेत्रातील शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. पारंपरिक खडू-फळा शिक्षण पद्धतीला मागे टाकत, आज बहुतेक मनपा शाळांमध्ये डिजिटल शिक्षण प्रणाली, स्मार्ट बोर्ड, आणि रोबोटिक्स शिक्षण प्रणाली यांसारखी आधुनिक साधनं वापरली जात आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, संगणक आणि तंत्रज्ञानाची गोडी निर्माण व्हावी यासाठी मोफत संगणक प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले आहेत. योगाची आवड निर्माण होण्यासाठी योगा शिबिरं राबवली जात आहेत. नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्तम गुण मिळावेत यासाठी अतिरिक्त अभ्यासवर्ग देखील चालवले जात आहेत.आज मनपा शाळेत शासन मान्य अनुभवी शिक्षक विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी उत्तम रित्या घडवत आहे. म्हणूनच या वर्षीचा दहावीचा निकाल ९२ टक्के लागला आहे. आता गतवर्षीच शैक्षणिक वर्ष संपून पुन्हा नव्या उमेदीनं नवे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ला सुरुवात होत आहे.

सोमवार, दिनांक १६ जून २०२५ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व ३६ शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या आदेशानुसार, शाळेच्या पहिल्याच दिवशी मनपा अधिकारी वर्ग प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांचं हार्दिक स्वागत करणार आहेत. याच दिवशी गणवेशाचे मोफत वाटप देखील करण्यात येणार आहे.

तसेच मंगळवार, दिनांक १७ जून २०२५ रोजी मनपा कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमांच्या शाळांमधून सर्वोत्तम गुणप्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख, आणि सर्वसमावेशक गुणवत्ता शिक्षण हा मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा मुख्य उद्देश आहे.

# आराव प्राथमिक शाळेत
# गटविकास अधिकाऱ्यांनी केले नवागताचे स्वागत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : आज शाळेचा पहिला दिवस 16 जून 2025 रोजी रा.जि.प.शाळा आराव पेण या ठिकाणी शाळा प्रवेशोत्सव गटविकास अधिकारी अविनाश घरत यांच्या हस्ते नवागतांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले .इयत्ता पहिली मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे 'पहिले पाऊल' हा उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके आणि गणवेश वाटप करण्यात आले . यावेळी गटविकास अधिकारी यांनी मार्गदर्शनपर भाषणात मी स्वतः जि.प.शाळेत शिक्षण घेऊन उच्च पदापर्यंत झेप घेतली असे सांगून जि.प.शाळेत मिळणाऱ्या सुविधांविषयी माहिती दिली आणि विद्यार्थ्यांना प्रवेशासाठीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी गटविकास अधिकारी अविनाश घरत विस्तार अधिकारी समीर सानप तसेच केंद्रप्रमुख- गागोदे दत्तात्रेय कोठेकर ,आराव शाळेचे मुख्याध्यापक उल्हास नागांवकर व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भरत सकपाळ, उपाध्यक्ष सौ.सुजाता सकपाळ तसेच पालक, ग्रामस्थ, चंडीकाई माध्यमिक विद्यालय मुख्याध्यापक व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत अतिशय उत्साहात संपन्न झाला.

गागोदे केंद्राचे केंद्रप्रमुख दत्तात्रेय कोठेकर यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन करताना सांगितले की जि.प.शाळा आराव या ठिकाणी स्वतःच्या मुलांना शाळेत प्रवेश घेतला जिल्हा परिषदेच्या शाळेवर विश्वास ठेवला तो विश्वास आमच्या शाळेतील शिक्षक सार्थ ठरवतील असे आश्वासन केंद्रप्रमुख दत्तात्रय कोठेकर यांनी दिले.

माध्यमिक शिक्षक ज्ञानेश्वर पवार यांनी स्वतःच्या मुलीला जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला तसेच माध्यमिक विद्यालय आराव येथील क्लर्क श्रीपाद भोसले यांनी देखील स्वतःच्या मुलाला जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला म्हणून त्यांचे अभिनंदन केले.शाळा प्रवेशाच्या प्रथम दिवशी पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे तोंड गोड करण्यात आले.

# दहिसर येथे
# निरंकारी भक्तांचे रक्तदान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने संत निरंकारी सत्संग भवन, दहिसर (पूर्व) येथे रविवारी एक भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. 'रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नको' या उद्घोषाने प्रेरित होऊन निष्काम भावनेने मानवसेवा करण्याच्या सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या शिकवणूकीला कृतीत उतरवत १६३ निरंकारी भक्तांनी या शिबिरामध्ये उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. या शिबिरात संत निरंकारी ब्लड बँक, विलेपार्ले यांनी सहभाग नोंदवत रक्त संकलन केले. या रक्तदान शिबिराला अनेक मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली त्यामध्ये ए.पि.आय अंकुश दांडगे, ए.एस.आय दत्तात्रय गीते तसेच समाजसेविका रमा विश्वकर्मा यांचा समावेश होता. या मान्यवरांनी संत निरंकारी मिशनच्या मानवतेच्या प्रति निष्काम सेवा भावनेची स्तुती केली. संयोजक हिम्मतभाई चौहान यांनी मान्यवरांचे स्वागत करुन त्यांना धन्यवाद दिले. हे रक्तदान शिबिर स्थानिक मुखी घन:श्याम विश्वकर्मा यांच्या कुशल देखरेखीखाली सेवादल स्वयंसेवक आणि संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी अत्यंत यशस्वीरीत्या पार पाडले.

# प्रादेशिक परिवहन विभागाच्या ८ लिपिकांवर शिस्तभंगाची कारवाई

## (राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष शरद धुमाळ यांचे पाठपुराव्यास यश)

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /भिवंडी : महाराष्ट्र शासनाच्या प्रादेशिक परिवहनचे कार्यालय ठाणे, नवी मुंबई येथे कार्यरत असणारे वरिष्ठ लिपिक, मुख्य लिपिक यांनी मत्ता व दायित्व यांची वार्षिक विवरणपत्रे शासनाकडे सादर न करता ज्ञात व प्रत्यक्ष उत्पन्नाचा विचार करता उपसंपदा साठवली असल्याबाबत, राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष-शरद काशिनाथ धुमाळ यांनी मा मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे तक्रार केली होती, म्हणून त्याची गंभीर दखल घेऊन परिवहन आयुक्तांना कारवाईसाठी आदेश दिले. त्यानुसार ८ लिपिकांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली. सदर लिपिक हे १)संदीप बासरे, २) मनीष जाधव, ३)सचिन तायडे - वरिष्ठ लिपिक, ४) धनंजय मुकणे, ५) श्रीमती मेघमाला काणे (लिपिक), ६) सायली कोचरेकर (मुख्य लिपिक), ७)संतोष समेळ (वरिष्ठ लिपिक) तसेच ८) विकास परबत (लिपिक) या ८ कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केल्याचा अहवाल श्री संजय मेत्रवार (सहपरिवार आयुक्त, प्रशासन, महाराष्ट्र राज्य मुंबई) यांनी मुख्यमंत्री सचिवालय कक्ष - जिल्हाधिकारी कार्यालय, फोर्ट - मुंबई ४०००१ यांच्याकडे पाठविला आहे. तसेच सदर लिपिकांची चौकशी लाचलूचपत विभागाकडून सुरू झाल्याने परिवहन विभाग (RTO) यामध्ये खळबळ माजली आहे.

# महाराष्ट्रात समाजवादी पक्ष बळकट करणार - राष्ट्रीय सचिव डॉ. आनंद यादव



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ. आनंद यादव मुंबईत आले असून समाजवादी पक्षाचे मुंबई येथील राज्य उपाध्यक्ष अजय यादव, समाजवादी पक्षाचे पनवेल नवी मुंबई जिल्हाध्यक्ष आर. एन. यादव, जितेंद्र यादव, भोला यादव, राय इत्यादींनी शाल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. महाराष्ट्रात समाजवादी पक्षाच्या विस्तारावर चर्चा झाली आणि आनंद यादव यांनी सर्वांचे आभार मानले. महाराष्ट्रात समाजवादी पक्षाला बळकटी देतानाच २०२७ मध्ये उत्तर प्रदेशात समाजवादी सरकार स्थापन करण्याचा ठराव घेण्यात आला.



# शंभुदुर्ग संघटनेची खडवली महावितरण कार्यालयावर धडक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता : कल्याण : शंभुदुर्ग संघटना ठाणे जिल्हा अध्यक्ष सागर मोरे व संघटना पदाधिकारी सदस्य तसेच खडवली परिसर सांस्कृतिक मंडळ यांच्या वतीने आज महावितरण कार्यालय खडावली येथे धडक मोर्चा काढण्यात आला. खडवली परिसरात सातत्याने होणाऱ्या लाईट कपातीने परिसरातील लोक मोठ्या प्रमाणात त्रस्त आहेत. त्याचा परिणाम लहान मुले व शाळकरी मुलांवर होत असल्याने आज मोर्च्याच्या माध्यमातून खडवली येथील सर्व समस्या महावितरण मुख्य अभियंता व सहायक यांच्या निदर्शनात आणून देण्यात आल्या.

या मोर्चाला अनुसरून केलेल्या सर्व मागण्या महावितरण अधिकाऱ्यांनी मान्य केल्या असुन सर्व समस्या तत्काळ सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले. खडवली परिसरात समस्या सोडविण्यासाठी विशिष्ट प्रकारची एक टीम परिसरात नेमण्यात येणार असुन इतर दुरुस्तीचे काम करण्यासाठी आठवड्यातून एक दिवस शुक्रवार बंद घेण्यात येईल अशी ग्वाही मोर्चेकऱ्यांना देण्यात आली. उपस्थित मान्यवर पोलिस निरीक्षक येडगे, पोलिस निरीक्षक दोरेकर व इतर पोलीस सहकारी, शंभुदुर्ग संघटनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी व ग्रामपंचायत उपसरपंच शंभुदुर्ग संघटना जिल्हा संघटक चेतन शेलार व इतर सदस्य उपस्थित होते.



# अनधिकृत बांधकामाविरोधात मुरबाड नगरपंचायत समोरील उपोषण मागे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड नगरपंचायत हद्दीतील बागेश्वरी चौक येथे सुरु असलेले अनधिकृत बांधकाम थांबविले नसल्याच्या निषेधार्थ रोहन सुरेश तेलवणे हे मुरबाड नगरपंचायत विरोधात उपोषणाला बसले आहेत.

मुरबाड नगरपंचायत हद्दीतील अकृषिक क्षेत्राच्या लगत सर्व्हे नंबर 66/1/ब पै.प्लॉट नं.11 लगत व कुणबी समाज हाल रस्ता ते शास्त्रीनगर या 12 मीटर रोड रूंदी रूंदीकरणामध्ये अनाधिकृत बांधकाम चालू असून सदर बांधकामा बाबत कोणत्याही प्रकारचा 7/12, 8अ, गट बुक नकाशा , मोजणी नकाशा उपलब्ध तसेच बांधकामाची परवागी नसल्याचे उपोषण कर्ते रोहन तेलवणे यांचे म्हणने असुन नगरपंचायत कडे तक्रारी करून सुद्धा हे बांधकाम थांबविले नसल्याच्या निषेधार्थ मी हे उपोषण करीत असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान मुरबाड नगरपंचायत प्रशासनाच्या वतिने सदर बांधकाम थांबविले जाणार असल्याचे लेखी आश्वासन दिले असून उपोषण मागे घेण्यात आले आहे

# डोंबिवलीच्या के. व्ही. पेंढरकर कॉलेजमध्ये पार पडला कृतज्ञता सोहळा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : के. व्ही. पेंढरकर कॉलेजमध्ये आज कृतज्ञता सोहळा पार पडला. कॉलेज व्यवस्थापनाकडून कॉलेज विनाअनुदानीत करण्याचा घाट मोडीत काढण्याठी प्राध्यापक, माजी विद्यार्थी, विद्यार्थी यांनी जो लढा उभारला. त्या लढ्यात अनेकांचे सहकार्य मिळाले. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करुन त्यांना शाल, गुलाब पुष्पाचे रोपटे आणि भारतीय संविधानाची प्रत देऊन सन्मानित करण्यात आले.

कॉलेजच्या सभागृहात आयोजित सोहळयास शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे उपस्थित होते. त्यांनी लढ्याच्या पहिल्या दिवसापासून पाठिंबा देऊन हा प्रश्न विधान परिषदेत उपस्थित केला होता. तसेच माजी विद्यार्थी सोनू सुरवसे यांनी सेव्ह पेंढरकर ही मोहिम सुरु करुन एक वर्ष साखळी उपोषण सुरु ठेवले. या दोन्ही व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक बंडू पाटील, कां‌‌'ग्रेसचे प्रदेश प्रतिनिधी संतोष केणे आदीचा सत्कार करण्यात आला. प्रा. धनंजय पगारे यांनी प्रास्ताविकात त्यांची भूमिका व्यक्त केली.

आमदार म्हात्रे यांनी सांगितले की, मी या भागाचा आमदार असल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांवर होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात लढा देऊन त्यांना न्याय मिळवून देणे हे माझे आद्य कर्तव्य आहे. ते मी केले. व्यवस्थापनातील अध्यक्षांचे वय पाहता. त्यांच्या विरोधात जास्त अ'क्शन घेता आली नाही. मात्र कॉलेजवर प्रशासक नेमण्याच्या मागणी राज्य सरकारने मान्य करीत प्रशासक नेमला. कॉलेज आत्ता तुमच्या हाती आहे. ते वाढवा. त्याचा विकास करा असे आवाहन आमदार म्हात्रे यांनी यावेळी केले.आम्ही नेहमीच पुढे उभे राहून सर्व विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना अन्याय विरोधात नेहमीच पाठिंबा देऊ. असे यावेळी सोनू सुरवसे हे म्हणाले.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# मुरबाडमध्ये संपूर्ण दिवस पावसाची रिमझिम सुरुच

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

## भात पेरणीसाठी पडणारा पाऊस उत्तम शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण !






मुरबाड : मुरबाड तालुक्यात ग्रामीण भाग तसेच आदिवासी पट्टयात व मुरबाड शहर परिसरात गेले दोन-तीन दिवस संथदार पाऊस पडत होता परंतु सोमवारी सकाळपासून पावसाने काही ठिकाणी रिमझिम सुरूच तर काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाऊस बरसला आहे.

पडणारा पाऊस हा भात पेरणीसाठी उत्तम असल्याच्या प्रतिक्रिया शेतकरी वर्ग देत आहेत. तसेच रविवार व सोमवार पाऊस चांगल्या पद्धतीने पडत असल्याने भात पेरणीला मोठ्या प्रमाणात सुरुवात केली चित्र दिसून येत आहे. सतत दोन ते तीन दिवस पडत असलेल्या पावसामुळे छोटे , नाले,ओहल पाण्याने तुडुंब भरून वाहू लागले आहेत.

त्यामुळे सोमवारी पडत असलेल्या पाऊस शेतामध्ये तसेच रानमाळावर सर्वच ठिकाणी पाऊस साचल्याचे चित्र दिसून येत आहे. तर रविवारी पडलेल्या पावसाची २८ मि.मी. नोंद झाल्याची माहिती मुरबाड तहसील कार्यालयातून मिळाली आहे.

**रविवारी २८ मि.मी. पावसाची नोंद!**




# केडीएमसीच्या नागरी आरोग्य केंद्रांना राज्यस्तरीय कायाकल्प कार्यक्रमाचे पारितोषिक जाहीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाअंतर्गत सन 2025-26 मध्ये कल्याण डोंबिवली महापालिकेच्या नागरी आरोग्य केंद्रांना राज्य स्तरीय कायाकल्प कार्यक्रमाचे पारितोषिक जाहीर झाले आहे. यामध्ये दत्तनगर नागरी आरोग्य केंद्रास महाराष्ट्र राज्यात सहावा क्रमांक आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रात पहिला क्रमांक प्राप्त झाला आहे. तर महाराष्ट्रनगर नागरी आरोग्य केंद्रास महानगरपालिका क्षेत्रात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला असून, मढवी नागरी आरोग्य केंद्र व मंजुनाथ नागरी आरोग्य केंद्र या नागरी आरोग्य केंद्रांना प्रोत्साहनपर पारितोषिक जाहीर झाले आहे.

**प्रथम पारितोषिक विजेते**
**दत्तनगर नागरी आरोग्य केंद्र : रुपये २ लक्ष**
**द्वितीय पारितोषिक विजेते**
**महाराष्ट्रनगर नागरी आरोग्य केंद्र : रुपये १ लक्ष ५० हजार**

प्रथम पारितोषिक विजेते दत्तनगर नागरी आरोग्य केंद्र यांना रुपये 2 लक्ष, द्वितीय पारितोषिक विजेतेमहाराष्ट्रनगर नागरी आरोग्य केंद्र यांस रुपये 1 लक्ष 50 हजार, तर मढवी नागरी आरोग्य केंद्र व मंजुनाथ नागरी आरोग्य केंद्र यांना रुपये 50 हजार असे पारितोषिक राष्ट्रीय शहरी आरोग्य नागरी अभियानाअंतर्गत प्राप्त होणार आहे.

हे पुरस्कार प्राप्त झाल्यावर दत्तनगर नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.अध्वर्यु गौरकर व त्यांचे कर्मचारी महाराष्ट्रनगर नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.भारती पाटील व त्यांचे कर्मचारी तसेच मढवी नागरी आरोग्य केंद्राच्या तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ.पोर्णिमा ढाके व त्यांचे कर्मचारी, मंजुनाथ नागरी आरोग्य केंद्राच्या डॉ.माधुरी सोळंके व त्यांचे कर्मचारी यांचे महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.दीपा शुक्ल यांनी अभिनंदन केले आहे.

# दोन सराईत दरोडेखोर पोलिसांच्या ताब्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहरातील वंजारपट्टी नाका परिसरातील शानदार मार्केट परिसरात 30 जून रोजी मध्यरात्रीच्या सुमारास दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या चार जणांचा टोळीला भिवंडी शांतीनगर पोलिसांनी मोठ्या शिताफीने ताब्यात घेऊन अटक केली होती त्याच्या कडून पोलिसांनी 4 पिस्टल व बीएम.डब्ल्यू कार हस्तगत करून अधिक तपास करीत होते. वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास करणारे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुरेश चोपडेयांना मिळालेल्या माहितीवरून त्यांच्या पोलीस पथकाने बीएमडब्ल्यू या गाडी मालकासह पिस्टल विक्री करणारे दोघा तरुणांना मध्यप्रदेश येथून ताब्यात घेऊन अटक केली आहे.त्यामुळे या गुन्ह्यातील अटक आरोपींची संख्या 7 झाली आहे.

अमन उदयप्रतापसिंग रघुवंशी (रा.नजराणा कंपाऊंड,)प्रांशु उर्फ अनुज हिम्मतलाल रजक (वय २०) सुमित रजक ( वय २०,रा.सातना, म प्र )अशी अटक आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भिवंडी शहरातील नाशिक रोडवरील शानदार मार्केट परिसरात दरोडा टाकण्याच्या उद्देशाने 30 जून रोजी मध्यरात्री काही संशयित इसम आल्याची माहिती पोलिसांना मिळाली त्यामुळेपोलिसांनी सापळा रचून बीएमडब्ल्यू गाडी (कार) मध्ये बसलेले शोएब शाहीद शेख,नौशाद मक्सुद आलम खान,अफताब अफसर शेख,शाहाबुद्दीन अलीमुद्दीन अन्सारी यांना ताब्यात घेत कार ची झडती घेतली असता कार मध्ये दोन देशी बनावटीचे कट्टे,दोन देशी बनावटीचे पिस्टल,एक लोखंडी कटावणी,



लोखंडी रॉड,दोरखंड, मास्क, मिरची पुड,हॅन्डग्लोज,चाकु,मोबाईल व एक बीएमडब्ल्यु कार एकूण 17 लाख 35 हजार 200 रूपये किंमतीच्या मुद्देमाला जप्त करीत चौघांना 31 जून रोजी अटक केली होती. या गुन्ह्याचा अधिक तपास करताना सहा पोलिस निरीक्षक सुरेश चोपडे व त्यांच्या पथकातील पोलिस कर्मचारी करीत होते.अटक करण्यात आलेल्या आरोपींकडे कसून चौकशी केली असता बीएमडब्ल्यू गाडी (कार) मालक अमन उदय प्रतापसिंग रघुवंशी (रा.नजराणा कंपाऊंड,भिवंडी ) याचा सुद्धा या गुन्ह्याता सहभाग असल्याचे व त्यानेच शस्त्र खरेदी करून आणल्याचे समजल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेत चौकशी केली असता त्याच्याकडील शस्त्र सतना मध्यप्रदेश येथून शस्त्र खरेदी केल्याचे समोर आले.त्यामुळे पोलिसांनी मोबाईलच्या तांत्रिक तपासा च्या आधारे मूळचा मध्यप्रदेश येथील प्रांशु उर्फ अनुज हिम्मतलाल रजक (वय 20),यास नवीमुंबई येथून 7 जून रोजी तर त्याचा साथीदार सुमित रजक (वय 20)यास सातना मध्यप्रदेश येथून 12 जून रोजी ताब्यात घेत अटक केली.या दोघांना भिवंडी न्यायालयात हजर केले असता 16 जून पर्यंत पोलिस कोठडी ठोठावण्यात आली आहे. या गुन्ह्यातील एकूण अटक आरोपींची संख्या सात झाली आहे. या गुन्ह्यात शस्त्र विक्री करणारे अजून काही आरोपी अटक होऊ अशी माहिती सपोनि सुरेश चोपडे यांनी दिले आहे.

# खडवलीत अनुदानित आदिवासी आश्रम शाळा प्रवेशोत्सव संपन्न





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण** : नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे औचित्य साधून अनुदानित आदिवासी आश्रम शाळा खडवली या शाळेत शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात, पारंपरिक व ग्रामस्थ व पालकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचे स्वागत करताना उत्साहात करण्यात आले.

या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून युवा सेना अध्यक्ष व सिनेटचे सदस्य अल्पेश भोईर, माजी जिल्हा परिषद सदस्या दर्शना जाधव खडवली चे पोलीस पाटील विकास सोनवणे आदिवासी विकास विभागाचे ठाणे येथील सहायक लेखा अधिकारी विश्वास घुगे प्रकल्प कार्यालय शहापूर येथील कनिष्ठ विस्तार अधिकारी एस एन पोकळा पालक प्रतिनिधी रंजना रांजण व वनिता दोघाड तसेच गावदेवी शिक्षण संस्था संस्थेचे सचिव अर्जुन चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच पालक व ग्रामस्थ, शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व राष्ट्रगीताने करण्यात आली. त्यानंतर नव्याने शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्पगुच्छ, शाळेत प्रवेश टिळा लावून स्वागत करण्यात आले. विविध रंगीत फुगे, रांगोळया व सजावट यामुळे शाळा आकर्षक सजली होती.नवागत बालकांचे स्वागत यावेळी करण्यात आले आज पहिल्याच दिवशी नविन प्रवेश घेतलेल्या सर्व बालकांना शालेय पाठयपुस्तके, नविन गणवेश, लेखन साहित्य, तसेच दफ्तरे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले

"ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्ता आधारित शिक्षण मिळावे यासाठी शासन व प्रशासन सजग आहे. शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, उपक्रमशीलता आणि मूल्यमापन या सर्व बाबींमध्ये सातत्याने सुधारणा करण्यात येत आहेत. अशा शाळांमध्ये आपल्या मुलांना दाखल करून घ्यावे, हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे."

"शिक्षण ही केवळ पुस्तकी ज्ञानापुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शक ठरावी, यासाठी आदिवासी आश्रम शाळा प्रयत्नशील आहेत. शाळा प्रवेश उत्सवासारखे उपक्रम हे समाजात शैक्षणिक जागृती घडवण्यासाठी उपयुक्त ठरतात. पालकांनी आपल्या मुलांसाठी या शाळांमध्ये विश्वासाने प्रवेश घ्यावा, हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे."

या कार्यक्रमात ग्रामस्थ व पालकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. या आश्रम शाळेतील माध्यमिक मुख्याध्यापक दीपक चव्हाण व प्राथमिक चे मुख्याध्यापक शरद गोतारणे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू-भगिनींनी यशस्वीतेसाठी मोठे योगदान दिले. ग्रामीण भागात शिक्षणाविषयीचा सकारात्मक दृष्टिकोन तयार होतो आहे, हे या कार्यक्रमातून दिसून आले.

यावेळी सर्व विद्यार्थ्यांना गरम पाण्यासाठी हीटर मशीनचे उद्घाटन तसेच पंधरा नवीन संगणक संचाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले शाळा प्रवेशोत्सव केवळ एका शैक्षणिक उपक्रमापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो ग्रामस्थांच्या एकात्मतेचा, पालकांच्या विश्वासाचा आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याच्या दिशेने उचललेला महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.या कार्यक्रमाचे बहारदार सूत्र संचालन शिक्षक महेंद्र चंदे यांनी केले.




# जिल्हा परिषद शाळा कोरावळे येथे शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड ; मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कोरावळे येथे सोमवारी १६ जून २०२५रोजी 'शाळा प्रवेशोत्सव' आणि सन २०२५-२६ या नवीन शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ विविध उत्साहपूर्ण कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. राज्य शासनाच्या निर्देशानुसार हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी इयत्ता पहिलीमध्ये नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात, वाजत-गाजत मिरवणूक काढून शाळेत स्वागत करण्यात आले. शाळेची इमारत



आकर्षक रांगोळ्या, रंगीबेरंगी फुगे आणि टवटवीत फुलांनी सुशोभित करण्यात आली होती.

प्रवेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना नवीन गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. यासोबतच, विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी आठवण म्हणून छायाचित्रे काढण्यासाठी खास 'सेल्फी पॉईंट'ची व्यवस्था करण्यात आली होती, ज्याला चांगला प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मुख्याध्यापक मंगलदास कंटे यांच्या नेतृत्वाखालील शिक्षक वृंदातर्फे करण्यात आले. यामध्ये सीमा सोनवणे, अनिल भोईर, कृष्णकांत मलिक, प्रशांत माळी, प्रतीक्षा धुमाळ आणि वृषाली धुमाळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, ग्रामपंचायत कोरावळेचे सरपंच, उपसरपंच व सदस्य व शाळेचे आजी-माजी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांचा सक्रिय सहभाग होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान . काशिनाथ धुमाळ यांनी भूषविले, तशीच नामदेव धुमाळ, पत्रकार बाळासाहेब भालेराव, भूषण धुमाळ, अंगणवाडी कार्यकर्त्या गोल्हे व रेश्मा शिंगोळे यांनी प्रमुख उपस्थित राहून विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन केले.

या 'शाळा प्रवेशोत्सव' कार्यक्रमाची संकल्पना महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे आणि पंचायत समिती मुरबाड येथील गटविकास अधिकारी लता गायकवाड, गटशिक्षणाधिकारी संजय थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली साकारण्यात आली होती. संपूर्ण मुरबाड तालुक्यात व सर्वत्र अशा पद्धतीने नवीन वर्षाची सुरुवात झाली. अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दलची उत्सुकता आणि उत्साह वाढीस लागला असून, नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंदमयी वातावरणात झाली आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024